सांकेतांक क्र 1992080122

क्र एल. आर. ११५३/सी. आर. ३१८७/
ल-२/९२

पुणे, दिनांक ७ .८.१९९२

विषय :- पोटहिस्सा मोजणी व पोटहिस्सा
मोजणी फी वसूलीबाबत...

दुरुस्ती परिपत्रक

या कार्यालयाकडील परिपत्रक क्रमांक एल आर ११५३/ल-२/दि. १८.५.९० चे शेवटच्या परिच्छेदामध्ये सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी, कार्यालयाकडून पोटहिस्सा मोजणी कामी तक्रारी अर्ज प्राप्त झालेवर संबंधित खातेदारांकडून या कार्यालयाकडील क्र. एल. आर. २२७/सी. आर. २०७३/ल-३/८५, दिनांक १८.१०.८५ ने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे दहा पोटहिस्सा करिता २५०/- रुपये मोजणी फी वसूल करणेकरिता सूचना दिलेल्या आहेत.

एकत्रीकरण योजनेवर झालेल्या चुकीच्या मोजणीमुळे तक्रारी अर्ज येत असतात. सबब, सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांनी अमरावती येथील सभेत विनंती केलेवरुन सदरचे परिपत्रकातील शेवटच्या परिच्छेदातील सुचना मागे घेणेत येत आहे. तसेच एकत्रीकरण योजना चालू असलेले गांवामध्ये पोटहिस्सा मोजणी फी वसूल न करता प्रचलित पध्दतीप्रमाणे महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ कलम ८७ व १५३ प्रमाणे मोजणी व झालेला खर्च वसूल करण्याची कार्यवाही करावी. परंतु जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख व भूमापन तहसिलदार [ पोटहिस्सा ] यांचेकडून करणेत येणाऱ्या इतर पोटहिस्सा मोजणी फी वसूलीची कार्यवाही या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एल. आर. ११५३/ल-२, दिनांक १८.५.९० व एल. आर. २२७/ २०/ल-३/१९९२, दि. २३.६.९२ने दिलेल्या सुचनेप्रमाणे करण्याची आहे.

सदरचे आदेशाची अंमलबजावणी त्वरीत होणेची आहे.

सही/- [ जे. पी. डांगे ]
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख [म. राज्य. ] पुणे

१. प्रत /- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व] , २. प्रत/- अधिक्षक भूमि अभिलेख / विशेष अधिक्षक भूमि अभिलेख /एकत्रीकरण अधिकारी [सर्व]
३. प्रत /- जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख/सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी/भूमापन तहसिलदार/अप्पर जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख/विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी/चौकशी अधिकारी [सर्व].

" नि र्ग मि त "

सहाय्यक जमाबंदी आयुक्त
[ भूमापन ] पुणे

एन. व्ही. /१.८